सुविचार
सहनशील बनो,
सहनशीलता कायरता नहीं,
वीरता है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत



महाराष्ट्र दिनानिमित्त सर्व वाचकांना व हितचिंतकांना हार्दिक शुभेच्छा !

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. १ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# लातूरला विकसित भारताचं केंद्र बनविण्यासाठी साथ द्या

लातूर/प्रतिनिधी : लातूर येथे उभारण्यात आलेल्या मराठवाडा रेल्वेकोच फॅक्टरीमध्ये वंदे भारत रेल्वे बनणार आहेत. यासाठी लातूरमध्ये अनेक लहान -मोठे उद्योग सुरू होणार आहेत. लातूर हा आत्मनिर्भर भारताचा एक भाग बनणार असून भविष्यात लातूरला विकसित भारताचं केंद्र बनविण्यासाठी भाजपाला साथ द्या, असे आवाहन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. लातूरचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठीही राज्य सरकारच्या माध्यमातून प्रयत्न झालेलेच आहेत. आघाडी सरकारने त्या योजना गुंडाळून ठेवल्या होत्या. परंतु आता नव्याने योजनांना गती देवून लवकरात लवकर लातूरसह मराठवाड्याचा पाणीप्रश्न सोडविण्याची ग्वाही त्यांनी दिली. शैक्षणिक हब असणार्या लातूर येथे मोठे शैक्षणिक केंद्र उभारण्याचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित जनतेला दिला.



लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारासाठी मंगळवारी दुपारी लातूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भव्य जनआशीर्वाद सभा संपन्न झाली. या सभेस राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रिपाइंचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, खा. अजित गोपछडे, उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, माजी खा. रुपाताई पाटील निलंगेकर, राज्याचे मंत्री ना. संजय बनसोडे, लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. बाबासाहेब पाटील, लोकसभा प्रभारी प्रा. किरण पाटील, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, सुधाकर भालेराव, गोविंद केंद्रे, बब्रुवान खंदाडे यांच्यासह प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर विधानसभा प्रभारी गुरुनाथ मगे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी माने, संजय दोरवे, शैलेश लाहोटी, अयोध्या केंद्रे, अॅड. जयश्री पाटील आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रेरणा होनराव या उत्कृष्ट संचलन करत होत्या.

उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी मराठीतून सुरूवात केली. शैक्षणिक क्षेत्रात लातूरचे नाव गाजवणार्या लातुरकरांना माझा नमस्कार असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडताच उपस्थित जनसमुदायाने मोदी- मोदी नावाचा गजर सुरू केला. पंतप्रधान म्हणाले की, मागील दहा वर्षात देशात विविध विकास योजना राबवितानाच लातूरसाठी रेल्वे कोच कारखाना सुरू केला. या कारखान्यात वंदे भारत रेल्वे तयार होणार आहेत. विशेष म्हणजे लातूरात तयार झालेले कोच विदेशातही जाणार आहेत. या अनुषंगाने लातूर येथे अनेक उद्योग सुरू होणार आहेत. देशाला आत्मनिर्भर बनविताना लातूर हा त्यातील मुख्य भाग असणार आहे. त्यात लातुरच्या तरुणांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. यातूनच विकसित भारताचे केंद्र म्हणून लातूर उदयास येणार असल्याचे सांगतानाच भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## कोविडची पहिली लस बनवणाऱ्या शास्त्रज्ञावर भ्रष्टाचाराचे आरोप

बिजिंग : चीनच्या पहिल्या कोविड - १९ वरील लस निर्मिती करणाऱ्या टीमचे नेतृत्व करणाऱ्या चीनमधील सर्वात मोठ्या लस निर्मात्या कंपनीतील वरिष्ठ शास्त्रज्ञ यांग शिओमिंग यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून राष्ट्रीय विधानमंडळाच्या उपपदावरून निलंबित करण्यात आले आहे. चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसने (एनपीसी) शुक्रवारी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, यांग यांच्यावर ङ्गशिस्त आणि कायद्याचे गंभीर उल्लंघनफ केल्याचा आरोप आहे.

स्थायी समितीच्या चार दिवसांच्या बैठकीनंतर झालेल्या एनपीसीच्या विधानात सूचित केले होते की, यांगची आधीच पक्ष शिस्तपालन संस्था - केंद्रीय शिस्त तपासणी आयोगाकडून चौकशी केली जात आहे. मागच्या काही वर्षांपासून राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी देशात भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेतली आहे. यांग यांची बरखास्ती ही भ्रष्टाचारविरोधी अभियानाचा एक भाग असल्याचं बोललं जात आहे. चीनमधील आरोग्य यंत्रणेतील ही सर्वात मोठी कारवाई समजली जातेय.

यांग हे एक अनुभवी शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी सीएनबीजीमध्ये लस बनवणाऱ्या टीमचं नेतृत्व केलं होतं. या टीमनेच सिनोफार्मा बीबीआयबीपी-कोरवी व्हॅक्सिन बनवली होती. चीनची ही पहिली कोरोना व्हॅक्सिन होती. चीनच्या या पहिल्या लशीला सार्वजनिक उपयोगाकरीता मान्यता देण्यात आलेली होती. विशेष बाब म्हणजे यांग शिओमिंग यांना सप्टेंबर २०२० मध्ये त्यांच्या कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आलेला होता.

# मुंबईतील सर्व जागा महायुतीच जिंकणार

मुंबई : गेल्या दोन वर्षांपासून महायुती सरकारने मुंबईत चांगली कामे केली आहेत. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी यांनी केलेले काम लोकांसमोर आहे. महायुतीने केलेल्या कामांची पावती जनता देईल. पियुष गोयल यांच्यासह मुंबईतील सर्व जागा महायुती नक्की जिंकेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.


उत्तर मुंबईचे भाजपाकडून उमेदवारी देण्यात आलेल्या पियुष गोयल यांनी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी मुंबईत विजयाचा विश्र्वास व्यक्त केला. शिवसेनेकडून मुंबईत तीनही



उमेदवार मराठी दिलेले आहेत. पियुष गोयल मुंबईकर आहेत. त्यामुळे पियुष गोयल अमराठी आहेत, अशा प्रकारचा आक्षेप घेता कामा नये. कोणालाही तसा आक्षेप घेण्याचा अधिकार नाही. पियुष गोयल प्रचंड मताधिक्याने विजयी होतील, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

गेल्या २५ वर्षांत जेवढे काम झाले नाही, तेवढे काम दोन वर्षांत करण्याचा प्रयत्न महायुती सरकारने केला आहे. या कामांचा परिणाम या निवडणुकीतून नक्की दिसून येईल, असे सांगत आदित्य ठाकरेंनी केलेल्या टीकेवर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांच्या काळात किती झाडे कापली गेली, याचा हिशोब त्यांनी आधी द्यायला हवा. त्यांची सत्ता येणे म्हणजे मुर्खांच्या नंदनवनात फिरणे, अशी गत आहे, असा खोचक टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला.






धाराशिव येथील व्यासपिठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिवादन करताना श्री. बसवराज पाटील. या जाहीर सभेत पंतप्रधानासोबत प्रदेश भाजपा अध्यक्ष श्री. बावन कुळे, माजी मंत्री श्री. बसवराज पाटील.



लातूर येथील देवघर येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करताना श्री. शैलेश पाटील व डॉ. सौ. अर्चना पाटील . सोबत उपस्थित ना. श्री. संजय बनसोडे, आ. श्री. संभाजी पाटील, माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण.

# देशात आता परिवर्तनाचे वारे वाहत आहेत



लातूर : देशातील महिला, युवक, शेतकरी, कामगार कोणीही सुखी, समाधानी नाही. वाढती महागाई, बेरोजगारी, अत्याचार यामुळे देशात सर्वत्र चिंताजनक स्थिती आहे. याला जनता कंटाळली आहे. त्यामुळे देशात आता परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. काँग्रेसच्या मागे ताकदीने उभे राहण्याचा, काँग्रेसच्या उमेदवारांना मत देण्याचा ठाम विचार देशातील मतदारांनी केला आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे नेते, माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी येथे केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तांदुळजा (ता. लातूर) येथे लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा मंगळवारी (ता. ३०) आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. लातूर ग्रामीण चे आमदार धिरज विलासराव देशमुख, डॉ. शिवाजी काळगे, जगदीश बावणे, धनंजय देशमुख, मदन भिसे, सुभाष घोडके, अनुप शेळके याप्रसंगी उपस्थित होते.

आमदार अमित देशमुख म्हणाले, तांदूळजा व पंचक्रोशीतून काँग्रेस पक्षाला नेहमीच पाठींबा असतो. ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्यापासून लोकनेते विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख यांच्यापर्यंत सर्वांच्या पाठीमागे आपण उभे राहिले आहात. आपण काँग्रेसचा खासदारही निवडून दिला आहात. मात्र, मागील १० वर्षांत आपण भाजपची राजवट अनुभवली आहे. यातून सामान्यांना काय मिळाले? लातूरच्या विकासासाठी त्यांनी काय केले? याचे उत्तर त्यांनी काहीच केले नाही, असे आहे.

सोयाबीन व इतर पिकांना भाव नाही. गेल्या १० वर्षांत भाव दुपटीने **(पान ३ वर)**



लातूर येथील जाहीर सभेच्या व्यासपिठावर डॉ. अर्चना पाटील पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना अभिवादन करताना.




यशवंत धाराशिव जिल्हा
बुधवार दि. ०१ मे २०२४



कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## अनसुर्डा येथील तरुणांचा शिवसैनेत जाहीर प्रवेश

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. विविध पक्षांमधून खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आ कैलास पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तरुणांनी शिवसेना (ठाकरे) पक्षाकडे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. दि.२९ एप्रिल रोजी धाराशिव तालुक्यातील अनसुर्डा येथील युवकांनी आ कैलास पाटील यांच्या उपस्थिती प्रवेश केला
यावेळी प्रवीण माने, बालाजी माने, रितेश माने, रफिक शेख, सुरज माने, विशाल माने, शिवप्रसाद माने, ज्ञानेश्वर माने, अजिंक्य माने, नामदेव माने, अभिजीत माने, अमोल दुबे आदी कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. यावेळी पांडुरंग माने, युवा सेना विधानसभा प्रमुख सुरज पवार, ज्ञानेश्वर नामदेव



माने, आण्णा बोंदर,आदित्य बोंदर, जगन्नाथ डोके आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिराच्या विकासासह सोलापूर धाराशिव रेल्वे मार्ग करणार – प्रधानमंत्री मोदी





## हजारोंच्या उपस्थितीत मोदी यांचे अर्चनाताई पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन

## साठ वर्षात काँग्रेसने जे केले नाही ते ते भाजपने १० वर्षात केले

## भरड धान्यमध्ये देशाला आत्मनिर्भर बनविण्याचा निर्धार

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिराचा विकास करण्यासह सोलापूर – तुळजापूर – धाराशिव रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करण्यात येईल. तसेच मागील १० वर्षांमध्ये ७५ लाख कुटुंबांना नळाचे कनेक्शन दिले. तसेच काँग्रेस सरकारच्या काळात १२ हजार कोटी रुपयांचे तर एनडीए सरकारच्या सव्वा लाख कोटी रुपयांचे भरड धान्य खरेदी केले. विशेष म्हणजे विविध क्षेत्रात गेल्या साठ वर्षांमध्ये काँग्रेसने जे केले नाही ते भाजप प्रणित सरकारने केले असल्याचे सांगत भरड धान्यामध्ये भारताला आत्मनिर्भर बनविणार असल्याचा निर्धार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दि.३० एप्रिल रोजी व्यक्त केला. दरम्यान, महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे असे सांगत अर्चनाताई पाटील यांना मत म्हणजे थेट मोदीच्या खात्यात मत असल्याचे सांगत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस नकली असल्याचे सांगत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.

उस्मानाबाद लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ प्रधानमंत्री मोदी यांच्या सभेचे आयोजन धाराशिव तुळजापूर हायवे लगत गेस्ट हाऊस समोरील मैदानावर करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, पालकमंत्री

**भारत मोठ्या युध्दात आपल्या नागरिकांना सुरक्षित आणित आहे. मात्र पूर्वी आतंकवादी हल्ला करुन जात होते. त्यावेळी काँग्रेस वाचवा म्हणून रडत बसायची. जी सरकार स्वतः कमजोर असते. ती देश मजबूत बनवू शकती का ? असा प्रश्न उपस्थित करीत ज्यांचा स्वतःचा ठिकाणा नाही. ती सरकार भारताला नवीन उंचीवर नेऊ शकत नाही. विशेष म्हणजे विश्वासघात ही नवी ओळख असल्याचे सांगत काँग्रेसवर सडकून टीका केली.**

प्रा डॉ तानाजीराव सावंत, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील, अभिमन्यू पवार, राजेंद्र राऊत, सतीश चव्हाण, विक्रम काळे, ज्ञानराज चौगुले, माजी मंत्री बसवराज पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, ॲड मिलिंद पाटील, सुधीर पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, रिपाइंचे राजाभाऊ ओव्हाळ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा सुरेश बिराजदार, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, दत्ता साळुंखे, जिल्हा संपर्क प्रमुख अनिल खोचरे. सुनील चव्हाण, नितीन काळे, दत्ता कुलकर्णी, ॲड व्यंकटराव गुंड, सुरेश पाटील, नंदाताई पुनगुडे, अस्मिता कांबळे, धनंजय सावंत, सुनील चव्हाण यांच्यासह उमेदवार अर्चनाताई पाटील आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रधानमंत्री मोदी म्हणाले की, शक्तिशाली भारत व विकसित भारत करण्यासाठी आई तुळजाभवानीचा आशीर्वाद

**प्रधानमंत्री योजने अंतर्गत ४ कोटी लोकांना घरे दिली असून ३ कोटी नवीन घरे बांधण्यात येणार आहेत. कोणीही घरापासून वंचित राहू नये यासाठी आमचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले. आयोध्यामध्ये श्रीराम मंदिर बांधल्यामुळे जगातील रामभक्त मोठ्या संख्येने येत असल्याचे त्यांनी नमूद केले.**

घेण्यासाठी मी आलो असून १० वर्षांपूर्वी व आताचा भारत यामध्ये मोठा बदल झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. भारत गगन यान अंतरिक्षामध्ये पाठविण्याची तयारी करीत आहे. कोरोना व्हॅक्सीन

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून आजपर्यंत ३ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांना वाटप केले आहेत. तर धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर ८०० कोटी रुपये दिले आहेत.**

देखील भारताने तयार केले असून भारत व इतर देशातील नागरिकांचे प्राण वाचविले असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी शेतकऱ्यांना युरिया विकत घेण्यासाठी काठ्या खाव्या लागत होत्या. मात्र आम्ही सत्तेत आल्यापासून युरिया कमी पडू दिला नाही. विशेष म्हणजे एक पोते युरिया एका बाटलीत आला असून त्याचा शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगत अडीच लाख कोटी रुपये अनुदान दिले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच काँग्रेसच्या काळात ३६ सिंचन योजना होत्या. मात्र त्यापैकी बऱ्याच योजना रखडल्या असून अर्धवट राहिलेल्या योजना पूर्ण करण्याचे काम आमच्या सरकारने हाती घेतले आहे. तर आणखी नवीन योजना सुरू करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच काँग्रेसने शेतकऱ्यांना खोटे पॅकेज देण्याचे काम केले असल्याचा आरोप करीत ते म्हणाले की शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या नैसर्गिक अडचणी येत असून त्यांना पीक संरक्षण मिळावे यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली आहे. मी तुमचे जीवन बदलण्यासाठी रात्रंदिवस काम करीत आहे. तर विरोधक मला बदलण्यासाठी काम करीत असून ते मला नावे ठेवतात. त्याबरोबरच लोकशाही जाईल, संविधान धोक्यात आले आहे व आरक्षण जाईल असे सांगत असून हे सांगण्याची त्यांना गरजच का आहे ? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. या सभेला महिला व पुरुष हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

### भवानी मातेची प्रतिमा व त्रिशूल देऊन केला सत्कार

**प्रधानमंत्री मोदी यांचा धाराशिव माहिती मधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजपच्यावतीने श्री तुळजाभवानी मातेची प्रतिमा, गळ्यात कवड्याची माळ घालून व त्रिशूल देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.**

## खा. राजेनिंबाळकर कामाच्या जोरावर निवडून येतील – देशमुख



धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – फोडाफोडीच्या राजकारणात काही मोजके लोकप्रतिनिधी शिवसेनेत शिल्लक राहिले जे विकले गेले नाहीत. त्यामध्ये आपले खासदार राजेनिंबाळकर असून त्यांनी गेल्या पाच वर्षात केलेल्या कामाच्या जीवावर ते उभा आहेत. ते घराणेशाहीने लादले गेलेले नाहीत. तसेच देशात इंडिया आघाडीची सत्ता येणार आहे. तर खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे कामाच्या जोरावर खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर चांगल्या मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दि.३० एप्रिल रोजी व्यक्त केला.

औसा तालुक्यातील किल्लारी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार खा.राजेनिंबाळकर यांच्या प्रचारासाठी आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना खा. राजेनिंबाळकर यांनी पाच वर्ष काम केले असून त्याना जनता कामाच्या जोरावर निवडून देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शिवसेनेमुळे भाजप राज्यात वाढली व मोठी झाली. जेव्हा देशात त्यांचे बळ वाढले तसे पहिला वार भाजपने याच शिवसेनेवर केला. भाजपची ही जुनी पध्दत असून ज्याच्या बोटाला धरुन पक्ष उभा राहतो. ज्या शिढीवरुन ते वर चढतात पहिलाच वार त्याच लोकावर करतात हे आपल्याला शिवसेनेवर केलेल्या दगाबाजामुळे दिसून आले असल्याचे देशमुख यानी सांगितले. देशात इंडीया आघाडीचे सरकार येणार आहे, त्या सरकारमध्ये शिवसेनेच्या कोट्यातून खा राजेनिंबाळकर देशाच्या मंत्रीमंडळात असावे यासाठी देशमुख कुटूंब प्रयत्न करणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. एकीकडे मोदी सरकार मुठभर उद्योगपतींना जगविण्याचे काम करत आहे. तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मालाचे दर पाडण्याचे पाप देखील त्यांनी केले असल्याचा आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे सरकारचे दलाल या सगळ्या गोष्टी करुन बाहेरच्या देशातील माल आयात करण्यात येत असल्यामुळे देशातील शेतकऱ्यांचा माल कवडीमोल किंमतीमध्ये विकला जात आहे. त्यामुळे या सरकारला शेतकऱ्यांनीही त्यांची शक्ती दाखवून देत त्याना घरी बसविले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख दिनकर माने यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ पुत्र मल्हार यांनी साधला मतदारांशी संवाद

परंडा दि.३० (प्रतिनिधी) – लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला चांगलाच रंग चढला आहे. महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ युवा नेते मल्हार पाटील यांनी दि.२९ एप्रिल रोजी सायंकाळी परंडा शहरातील सुफीसंत हजरत ख्वॉजा बद्रोद्दीन यांच्या दर्ग्यावर फुलांची चादर अर्पण करून दर्शन घेतले व मतदारांशी संवाद साधला.

यावेळी मुजावर समाजाच्या वतीने मल्हार पाटील यांचा सन्मान करण्यात आला. महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना परंडा शहरातून मताधिक्य देणार असल्याचे माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी सांगितले. यावेळी शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे, माजी सभापती गौतम लटके, राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष नवनाथ जगताप, आण्णासाहेब देशमुख, राजकुमार पाटील, मतीन जिनेरी, वाजीद दखणी, सरफराज कुरेशी, संजय घाडगे, तनवीर मुजावर, जावेद पठाण, सलीम हन्नुरे, वैभव पवार, शरीफ तांबोळी, दत्ता रणभोर, बालाजी नेटके, बच्चन



गायकवाड, रत्नकांत शिंदे, तय्यब शेख, धनाजी जाधव, खाजा बागवान, गोवर्धन शिंदे, नासेर शेख, सुरेश काशीद, धीरज ठाकूर आदी उपस्थित होते.

## महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना बंजारा परिषदेचा जाहीर पाठिंबा

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – बंजारा समाजाविषयी आपली तळमळ, समाजाची केलेली विकास कामे यावर विश्वास ठेऊन राष्ट्रीय बंजारा परिषदेचे अध्यक्ष ॲड. पंडित राठोड यांनी धाराशिव येथे भेट घेतली व अर्चना पाटील यांना जाहीर पाठिंबा दर्शविला.

यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे आदी उपस्थित होते. बंजारा समाजाच्या गोडबोली भाषेला आठव्या सुचित आणण्यासाठी आपण केंद्रात प्रयत्न करावा, अशी मागणी समाजाच्यावतीने करण्यात आली. याविषयी आपण लवकरात लवकर पुढील कार्यवाही करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राष्ट्रीय बंजारा परिषद ही देशस्तरावरील गोरबंजारा समाजाची सर्वात मोठी संघटना आहे. या संघटनेमध्ये समाजातील धार्मिक, राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. राष्ट्रीय बंजारा परिषदेमुळे गोरबंजारा समाजातील सर्व तांडे धर्मपीठाशी जोडले गेले आहेत. त्यामुळे तांडा स्तरावरील नायक, कारभारी, पुजारी, तांडा समिती नायक, महिला समिती, गोरबंजारा धर्मपीठाचे पदाधिकारी, पालखीचे



पदाधिकारी हे सर्व राष्ट्रीय बंजारा परिषदेशी निगडित आहेत. वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचा प्रश्न देखील आपण लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील आहोत. येत्या काळात गोरबंजारा समाजाविषयी मोठे कार्य करण्याचा आपला मानस असून आपल्या हक्काचा खासदार असल्यास ते निश्चितच पूर्णत्वास जाईल, असा विश्वास आ राणाजगजितसिंह पाटील यांनी यांनी व्यक्त केला.

# पांढरवाडी लघु प्रकल्प आरक्षीत असतानाही पाणी उपसा सुरु

**प्रशांत तांबोळकर**

शिरूर आनंतपाळ / प्रतिनिधी: पांढरवाडी लघु प्रकल्पात सध्या केवळ ०५ % एवढा पाणीसाठा शिल्लक असताना काही शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या शेतीसाठी पाणी उपसा होत असल्याची तक्रार भीमशक्ती संघटणेचे तालुका अध्यक्ष प्रकाश बनसोडे यांनी जिल्हाधिकारी लातुर यांच्याकडे केली आहे.

विद्युत मोटारीद्वारे पाणी उपसा सुरु असल्याची ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही समन्वयाअभावी शेतकरी बिनधास्त पाणी उपसा करत आहेत.

प्रशासनाने अवैध पाणी उपसा करणाऱ्याविरोधात कारवाई करून वीजपंप जप्त करावेत, अशी मागणी होत आहे. या प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प आहे. उन्हाळ्यात होणारे बाष्पीभवन पाहता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आक्राळविक्राळ रूप धारण केल्यानंतर त्यानंतर मृत पाणीसाठ्यावर अवलंबून रहावे लागणार आहे.

माजी पालकमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर व जिल्हाधिकारी वर्षा घुग्गे यांनी नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच पाणी वापराचे नियोजन करण्यासाठी सर्वच साठवण तलाव, मध्यम प्रकल्प याठिकाणचे पाणी आरक्षित करण्याबाबत आदेश काढले होते. त्यानंतर काही प्रमाणात कारवाई करण्यात आली.

मात्र पाटबंधारे, महसुल व महावितरण यांच्यात समन्वय नसल्यामुळे पुन्हा एकदा पांढरवाडी लघु प्रकल्पातुन काही शेतकऱ्यांकडून विद्युत पंपाद्वारे पाणी उपसा सुरु आहे. महावितरण व पाटबांधारे विभागाने संयुक्त कारवाई करणे आवश्यक आहे.

## येरोळ येथे पाण्याची तीव्र टंचाई



### तहसिलदाराचे दुर्लक्ष...

पांढरवाडी येथील लघु प्रकल्पातुन काही शेतकऱ्याकडुन विद्युत मोटारीद्वारे पाणी उपसा सुरुच आहे हि बाब तहसिलदार, मंडळ अधिकारी तलाटी व पाट बंधाऱ्याच्या अभियंत्याला फोनवर सांगुनही जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याने तलावात केवळ ०५ % पाणी साठा शिल्लक आहे .तरी देखील काही शेतकरी पाणी उपसा करत आहेत. त्यामुळे येरोळ पांढरवाडी, हानमंतवाडी व जांभळवाडी येथे पाण्याची टंचाई भासत असुन घोटभर पाण्यासाठी नागरिकांना वनवन भटकावे लागत आहे.

**- प्रकाश बनसोडे अध्यक्ष**
**भीम शक्ती संघठणा शिरूरआनंतपाळ.**

### निवडणुकीमुळे दुर्लक्ष

सध्या तहसिल कर्मचारी, पाटबंधारे विभाग यांना लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कामे लागली आहेत याचाच फायदा घेत तलावा लगत असलेले शेतकरी रात्रंदिन तलावात पाणबुडीच्या मोटारी टाकुन पाणी उपसा करत आहेत त्यामुळे येरोळ जांभळवाडी, पांढरवाडी येथे पाण्याची टंचाई निर्माण झाल्याची माहीती उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी दिली. पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी संयुक्त मोहीम राबवुन पाणी उपसा करणाऱ्या शेतकऱ्यावर पोलीस कारवाई करावी अशी मागणी उपसरपंच सतिस सिंदाळकर यांनी केली आहे.

# महाराष्ट्र अस्थिरोग दिवसानिमित्त आज हाडांच्या आजारावर शिबीर : डॉ.अशोक पोद्दार

लातूर : दि. १ मे हा दिवस महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेच्या वतीने महाराष्ट्र अस्थिरोग दिवस म्हणून साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटना व रोटरी क्लब ऑफ लातूरच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी हाडांच्या आजारावर मार्गदर्शन ,चर्चासत्र व अस्थिरोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष डॉ.अशोक पोद्दार यांनी दिली.

महाराष्ट्र अस्थिरोग दिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक व आरोग्य विषयक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने अस्थिरोग तपासणी , फिजिओथेरपी, रक्त तपासणी, डिजिटल एक्सरे, एमआरआय, सिटी स्कॅन, हाडांच्या ठिसूळपणाच्या तपासणीवर २५ टक्के सूट देण्यात येणार आहे. यावर्षी संघटना सांधे वाचवा अभियान चालविणार आहे. त्यानिमित्त सायंकाळी ५ वाजता औषधी भवनच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांकरिता हाडांच्या आजारावर मार्गदर्शन व चर्चासत्रही होणार आहे.

महाराष्ट्र अस्थिरोग दिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्र व शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. संतोष माळी मी प्रेसिडेंट इलेक्ट डॉ. गिरीश कोरे, माजी अध्यक्ष डॉ. द्वारकादास तापडिया, उपाध्यक्ष डॉ. चेतन जाजू, डॉ. रणजीत हाके पाटील, सहसचिव डॉ. तुषार पिंपळे, डॉ. रोहन अकोसकर, कोषाध्यक्ष डॉ. मन्सूर भोसगे , डॉ.आशिष चलवदे, डॉ.शशिकांत कुकाले, डॉ. निलेश देशमुख, डॉ. विक्रम सूर्यवंशी, डॉ. किरण गोजमगुंडे, डॉ. श्रीनिवास संदीकर, डॉ. मधुसूदन बियाणी, डॉ. तुला उरगुंडे, डॉ. खालेद काझी, डॉ. हनुमानदास चांडक,डॉ. ऋषिकेश नळवदे, डॉ. इमरान कुरेशी, सन्घटनेचे उदगीरचे प्रतिनिधी डॉ. श्रीनिवास बलशेटवार ,डॉ. अजय महिंद्रकर, अहमदपूर प्रतिनिधी डॉ. वैभव रेड्डी, डॉ. सुनील चलवदे, निलंगा प्रतिनिधी डॉ. तात्यासाहेब देशमुख, अंबाजोगाई प्रतिनिधी डॉ. दीपक लामतुरे, डॉ. निलेश तोष्णीवाल, उमरगा प्रतिनिधी डॉ. राजकुमार कानडे, डॉ. सचिन विश्वेकर आदिंनी केले आहे.

# डॉ. जयद्रथ जाधव यांना गुरूवर्य पुरस्कार जाहीर

लातूर / प्रतिनिधी- मराठवाडा साहित्य परिषद लातूर शाखेचे अध्यक्ष व शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ.जयद्रथ सुभाषराव जाधव यांना या वर्षाचा गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ कौळखेड ता.उदगीर अर्थात ऋद्भझच् या संस्थेचा शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी दिला जाणारा गुरूवर्य पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ.जयद्रथ जाधव हे मराठी साहित्याचे अभ्यासक, आहेत.संत साहित्य, ग्रामीण साहित्य व शेतकरी साहित्याचे ते विशेष अभ्यासक आहेत.

जागतिकीकरणानंतर मराठी भाषेवर होत असलेल्या भाषिक व सांस्कृतिक आक्रमणाचा अभ्यास जागतिकीकरण, मराठी भाषा: आव्हाने आणि उपाय या ग्रंथातून त्यांनी केला आहे.या बरोबरच १९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा,१९९० नंतरचे ग्रामीण साहित्य स्वरूप आणि संदर्भ या ग्रंथांमधून ग्रामीण, दलित, स्त्री, आदिवासी व समकालीन साहित्याची समीक्षा केली आहे. तीस शोधनिबंध विविध नियतकालिकांमधून प्रकाशित आहेत. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळावर ते तीन टर्म सदस्य होते.विद्यार्थी कल्याण मंडळ सल्लागार समिती सदस्य,बहि:शाल व्याख्यान माला सल्लागार समिती सदस्य म्हणून ही विद्यापीठ समित्यांवर काम केले आहे.



एम.फिल, पीएचडी चे मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थ्यांना एम.फिल.,आणि सात विद्यार्थ्यांनी पीएच.डी पदवी प्राप्त केली आहे.

त्यांना यापूर्वी म. जोतीराव फुले विभागीय शिक्षक पुरस्कार, जे.एस.पी.एम. शिक्षण संस्थेचा राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद गौरव पुरस्कार, कै.गंगाधरराव मोरजे स्मृती पुरस्कार, जयक्रांती साहित्य प्रेरणा पुरस्कार, हुतात्मा चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी लातूरचा सामाजिक कार्य पुरस्कार आणि कै.देविदासराव जमदाडे प्रबोधन व विचार मंचचा राज्यस्तरीय कार्यनिष्ठ पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. जयद्रथ जाधव यांनी लातूर: वसा आणि वारसा या ग्रंथामधून लातूर जिल्ह्याचा विविध क्षेत्रातील दोन हजार वर्षांचा इतिहास उजेडात आणला आहे.८२५ पृष्ठाच्या ग्रंथात ७५ लेखांमधून लातूर जिल्ह्याचा संपूर्ण इतिहास यात नोंदवला आहे.बिगर राजकीय संस्थेने व स्वतंत्रपणे केलेले हे काम महाराष्ट्र पातळीवर एकमेव आहे.जिल्ह्याची सर्वच क्षेत्रांची इत्यंभूत माहिती यात आहे. तसेच करोना काळात विद्यापीठ परिक्षेत्रातील फेसबुक लाईव्ह ६६ व्याख्यानाचे आयोजन करून मोबाईलच्या माध्यमातून मराठी पदवीचा अभ्यासक्रम शंभर टक्के पूर्ण केला आहे. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष व प्रेरणास्थान मा.आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष मा.अजितसिंह पाटील, सचिव सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक श्री निळकंठराव पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ.आर. एस.अवस्थी सर, उपप्राचार्य श्री मारूती सूर्यवंशी, डॉ.रमाकांच घाडगे, डॉ.पी.आर. शिंदे, डॉ.गणेश नागरगोजे, डॉ.सतीश यादव, डॉ.ए.एस.कसबे, डॉ.नांदे एस.एम., डॉ. आर.सी.जाधव, डॉ.क्रांती मोरे, डॉ.सुरेश पवार, डॉ.शाम लेंडवे, डॉ.अशोक मोटे डॉ. विजयकुमार तांबारे, डॉ.शंकर यादव, डॉ. एस.व्ही फडके,प्रा अनिल ठेंगे, डॉ.अभिजित पत्की,प्रा.मनोज भुजबळ, डॉ.अंकुश भंडे, डॉ.संभाजी पाटील डॉ.दुष्यंत कटारे, डॉ. लहू वाघमारे, कवी,नरसिंग इंगळे श्री विवेक सौताडेकर आदिंनी अभिनंदन केले आहे.

### देशात...

वाढायला पाहिजे होता; पण उत्पादनखर्च दुपटीने वाढला आहे. शेतीत उत्पन्न तेवढेच आहे; पण शेतीमालाला भाव नाही. यामुळे शेतकरी आत्महत्या करतोय. शेती परवडत नाही. अशीच नाराजी युवक, महिला, मजूर, व्यापारी अशा सर्व स्तरांत आहे. त्यामुळे जनतेला आता परिवर्तन हवे आहे. बदल हवा आहे. जनता आता भाजपच्या खोट्या आश्र्वासनांना, जुमल्यांना बळी पडणार नाही, असे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले.

आमदार धिरज देशमुख म्हणाले, संविधानाचे रक्षण करण्याची, लोकशाही जपण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी ही निवडणुक आहे. देशातील महागाई, बेरोजगारी हटवण्यासाठीची ही निवडणूक आहे. त्यामुळे सर्वांनी गांभीर्याने मतदान करावे. डॉ. शिवाजी काळगे यांना आपण प्रंचड मतांनी निवडून द्यावे. मराठवाडा रेल्वे बोगी कारखान्यामध्ये लातूरमधील अधिकाधिक तरुणांना रोजगार मिळण्यासाठी, शेतीमालाला हमीभाव आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्यासाठी, जीएसटी मुक्त शेती करून सरकारचे जाचक धोरण बदलण्यासाठी आपण डॉ. काळगे यांना आशीर्वाद द्यावा. डॉ. शिवाजी काळगे म्हणाले, केंद्र सरकारच्या विरोधात सर्वत्र वातावरण आहे. काँग्रेस, महाविकास आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा प्रतिसाद असाच ठेवून मला आपली सेवा करण्याची संधी द्यावी.

यावेळी महारुद्र चौंडे, शाहूराज पवार, जयचंद भिसे, किशनराव लोमटे, कैलास पाटील, अरुण कुलकर्णी, वसंत उफाडे, अशोकराव काळे, श्रीमंत गायकवाड, रणजित पाटील, बाबुराव जाधव, बलभीम शिंदे, दत्ता शिंदे, शफी शेख, लक्ष्मण पाटील, अप्पासाहेब हिप्परकर, शिवाजी बावणे, हरीभाऊ गायकवाड, अंगद सूर्यवंशी, बालाजी वाघमारे, गोवर्धन मोरे, व्यंकट पिसाळ, बंकट कदम, गोविंद बोराडे, भैरवनाथ सव्वासे, साहेबराव पाखरे उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता बनाळे, कमलाकर अनंतवाड यांनी केले.

पदाधिकाऱ्यांनो, आता गाव सोडू नका !

लोकनेते विलासराव देशमुख, बब्रुवान काळे, शिवाजी भिसे यांचा हा मांजरा पट्टा आहे. या नेत्यांनी मांजरा पट्टा घडविला. येथील शेतकऱ्यांच्या ऊसाला कायद्याने हमीभाव दिला जातो. ४० वर्षांपासून यात सातत्य ठेवण्याचे काम मांजरा परिवाराच्या नेतृत्वाने केले आहे. आपल्याला येथेच थांबायचे नाही. सिंचन व्यवस्था मजबूत करायची आहे. बळीराजाचे अनेक प्रश्र्न मार्गी लावायचे आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी आता गाव सोडू नका. मांजरा पट्टा येथील सर्व नेते गावात ठाण मांडून बसले पाहिजेत. आणि मलातूर ग्रामीणफ्मधून डॉ. काळगे यांना सर्वाधिक मताधिक्य द्यावे.

## उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

### मराठवाडा अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन लि. छत्रपती संभाजीनगर

अर्बन बँक भवन''प्लॉट नं. २७, विकासपुरी, चिनार गार्डन जवह, पडेगांव, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

**जाहीर नोटीस**

अर्जदार बँक: दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. परळी वै. शाखा- पानगांव जि. लातूर
जा.क्र./१२/२०२४-२५
दि.२६.०४.२०२४

| अ.नु. | खाते क्रं. | दावा क्रं. | कर्जदाराचे नाव | जामीनदारांचे नाव |
|---|---|---|---|---|
| ०१. | २६/१७१९ | १७३८ | सौ. कालिंदा रमाकांत चाटे, मु. सोमनवाडी पो. पट्टीवडगांव ता. अंबाजोगाई जि.बीड (जा.दे.१) | श्री रमाकांत उत्तमराव चाटे, मु.सोमनवाडी पो. पट्टीवडगांव, ता. अंबाजोगाई, जि.बीड (जा.दे.२) श्री. भाारत सुर्यकांत केंद्रे, मु.सोमनवाडी, पो. पट्टीवडगांव, ता. अंबाजोगाई, जि. बीड. (जा.दे.३) |

वसुलीस पात्र रक्कम रुपये ५९,९५५/-

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिवादींना अर्जातील रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादींना समन्स रूजु न झाल्याने व त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक १५/०५/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधा कागदपत्रासह आपणा या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीसद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणून आज दिनांक २८/०४/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

**सुनावणीचे ठिकाण:-**
उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
मराठवाडा अर्बन बँक्स को-ऑप, असोसिएशन, लि. छत्रपती संभाजीनगर
अर्बन बँक भवन, प्लॉट नं.२७, विकासपुरी,
चिनार गार्डन जवह, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

**उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)**
मराठवाडा अर्बन बँक्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशन
लि. छत्रपती संभाजीनगर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली.

या जयंतीच्या निमित्ताने प्रारंभी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.चंद्रकांत मोरे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अंगद कोते यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी डॉ. वैशाली माढेकर, प्रा.नंदा खरटमल, प्रा. बालिका गौंड, प्रा. संतोष कल्याणकर, हनुमंत शिंदे, बाळासाहेब देशमुख, डॉ.महावीर कटके, प्रा.महारुद्र बिडवे, राजकुमार कांबळे, प्रकाश मेहरकर, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ.अभिजीत बादाडे, विठ्ठल मुळे, प्रा.सुरेश बिराजदार, विद्यार्थी प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी देशमुख, नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले.

## जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज क. ५८/२०२४**
**कमलबाई /-**
**निशाणी क. ७**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्यापेक्षा कुंडलिक कुंडीबा नागरगोजे, राहणार रा. गोढाळा ता. रेणापूर जि. लातूर हे ता. २७/०९/२०२३ रोजी किंवा त्या सुमारास मौ. विलासराव देशमुख गव्हॅमेंट मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारानी हया कोर्टास सदरहू मथताचे वारस खालील प्रमाणे-अर्जदार:- १. कमलबाई कुंडलिक नागरगोजे, वय ७० वर्षे धंदा-घरकाम २. रुक्माजी कुंडलिक नागरगोजे, वय ४० वर्षे धंदा शेती दोघे रा. गोढळा ता. रेणापूर जि. लातूर ३. केराबाई बळीराम केदार, वय ५० वर्षे धंदा-घरकाम रा. राजेवाडी ता. रेणापूर जि. लातूर ४. ज्ञानेश्वरी पंडीत लहाने, वय ४८ वर्षे धंदा-घरकाम ५. रंजना पंडीत लहाने, वय ४६ वर्षे धंदा-घरकाम दोघी रा. माकेगाव ता. रेणापूर जि. लातूर घरकाम ६. अंजली अर्जुन कराड, वय ४४ वर्षे धंदा-घरकाम रा. कृष्णा नगर, लातूर ता. जि. लातूर यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीय पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कुंडलिक कुंडीबा नागरगोजे बास्स असल्याबद्दल वारसा प्रमाणपत्र देईल
पुढील तारीख: १२.०४.२०२४
तारीख २६ माहे ०३ रान २०२४

**क.लिपीक**
**सह दि.न्या.क.स्तर**
**रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर रेणापुर**

## जाहीर प्रगटन

मला अधिकृत केल्यावरून आणि मिळालेल्या माहितीवरून व मला दाखवण्यात आलेल्या कागदपत्रावरून तमाम जनतेस व लातूर जिल्हयातील मौजे टाके नगर, ता व जि-लातूर येथील व परिसरातील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की मौजे टाके नगर भागातील, लातूर येथील ता व जिल्हा लातूर येथील महानगरपालिकेच्या हद्यीतील सर्वे नं.२२७ येथील प्लॉट नं. १९ चा पश्चिम भागाची घरजागा ज्याचा जुना मनपा नं. आर-२/२७९/१ व नविन मनपा नं. ए- ४/४८७ व ज्याच्या खरेदी खताचा डेबूक नं.१०५८/१९९४ दि.०३/०६/१९९४ हा असून याची लांबी दक्षिण-उत्तर ४० फूट रूंदी पूर्व-पश्चिम-२५ फूट असून एकुण क्षेत्रफळ १००० चौ. फूट (९९.९३ चौ.मी.) असा आहे जो प्लॉट लिहून घेणार-डॉ. मुजीब मजीद फारूकी, रा. टाके नगर, अंबाजोगाई रोड, लातूर लिहून देणार-अब्दूलगणी मोहमद खाजासाब सय्यद, रा. टाके नगर, लातूर यांच्यामध्ये खरेदीखताचा ठराव दि.१४.०७.२०२३ रोजी करण्यात आला त्याचा तपशील पूढील प्रमाणे.... प्लॉटची चतुः सिमा पुर्वेस-सदर प्लॉटचा भाग सय्यद अब्दूल सईद याची घरजागा, पश्चिम- २० फूट रुंदीचा रस्ता, दक्षिण-२० फूट रुंदीचा रस्ता, उत्तर प्लॉट नंबर २० मोहसीनसाब यांची घरजागा उपरोक्त चतुः सिमेच्या आतील व दिलेल्या तपशीलातील प्लॉट माझे पक्षकार लिहुन घेणार यांनी लिहून देणार यांना एकूण प्लॉटची ठरावाची किंमत अदा करून खरेदी खत लिहुन देणार यांनी करून देण्याचे मान्य केले असून लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना कायमस्वरूपी खरेदीखत करून प्लॉट नावे मालकी कब्जेत देण्याचे ठरले ते लिहुन घेणार व लिहुन देणार यांना मान्य आहे. लिहून देणार यांनी खरेदीखतासाठी व कब्जे मालकीची नोंदकरून देण्यासाठी ज्या कागदपत्राची पूर्तता करावी लागेल ती सर्व देण्याचे मान्य केलेले आहे. सदरील जमीन वर्ग करण्यास किंवा व्यवहारास कोणाचा कांही आक्षेप, उजर वा हरकत असेल किंवा सदरील मालमत्तेसंबंधात कोणाचे हितसंबंध गुंतलेले असतील तर त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून पाच दिवासाच्या आत त्यांच्याकडील सर्व कागद पत्रासह माझ्याकडे खालील पत्यावर आक्षेप नोंदवावा, मुदतीच्या आत कोणाचाही आक्षेप नाही आल्यास सदर प्लॉट/मालमत्ता ठरावाने, रजिस्टर्ड खरेदीखत किंवा ईतर पध्दतीने लिहून घेणार वर्ग करून घेतील व दफ्तरी मालकी कब्जे नावे नोंद करून वंशपरंपरेने उपभोग घेतील. प्लॉटचे खरेदीखत किंवा ईतर पध्दतीने वर्ग केलेनंतरचे आक्षेप वा उजर लिहून घेणार वा माझ्या पक्षकारांवर मुळीच बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
सबब हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार
**डॉ. मुजीब मजीद फारूकी,**
मो.नं. ९८६०३४५४६

तर्फे
**ॲड. शेख लायकअली नदीसाब**
सी/ओ जुने बरूरे कॉम्प्लेक्स,
एसटी वर्कशॉपसमोर,
अंबाजोगाई रोड, लातूर, मो.नं. ९४२३३५२२६७
मेल आयडी
advslayakngmail.com


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस
**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ४.५% |
| ४६ ते १८० दिवस | ७% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८% |
| १२ महिने ते २४ महिने | १०% |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत उदगीर

बुधवार दि. १ मे २०२४

पान ४

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# देशातील सर्व घटकांचे कल्याण करणारा पंतप्रधान देशाला पाहिजे



लातुर प्रतिनिधी - देश आज राजकीय अराजकतेमधून सध्या जात आहे. स्वतंत्र पूर्व काळात अनेक थोर महापुरुषांनी लढा देऊन देशाला स्वातंत्र्य दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला घटना दिली ज्याची दखल जगभरात घेतली जाते. देशातील सर्व घटकांचे कल्याण करणारा लोकप्रतिनिधी, पंतप्रधान देशाला पाहिजे, यासाठी देशात इंडिया महाविकास आघाडीचे सरकार येणे ही काळाची गरज आहे असे उद्गार सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी काढले आहेत.

लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ सोमवार दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी लातुर ग्रामीण मतदार संघातील रेणापूर या ठिकाणी जाहीर प्रचार सभा सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य व लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या समवेत पार पडली. या सभेच्या प्रारंभी आदरणीय लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले की, देश आज राजकीय अराजकते मधून सध्या जात आहे. स्वतंत्र पूर्व काळात अनेक थोर महापुरुषांनी लढा देऊन देशाला स्वातंत्र्य दिले.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला घटना दिली ज्याची दखल जगभरात घेतली जाते. देशातील सर्व घटकांचे कल्याण करणारा लोकप्रतिनिधी, पंतप्रधान देशाला पाहिजे, शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव,शिक्षण, आरोग्य देणारा पंतप्रधान आपल्या देशाला पाहिजे. दहा वर्षांपूर्वी तुम्ही जेथे होता तिथेच आहात आपण ज्यांना निवडून दिले त्यांच्याकडून सर्व सामान्य माणसाचा विकासाचा कधी विचार देखील केला नाही.

अच्छे दिनचे स्वप्न आपल्याला दाखविले आणि खिशे मोठ्या उद्योग पतीचे भरले सहकार महर्षी दिलीपराव देशमुख काँग्रेस पक्ष एका विशिष्ट जातीसाठी काम करते अशी भावना आपल्या मनात निर्माण करीत आरक्षण व जाती पातीच्या नावाने आपल्यात तेढ निर्माण करण्याचे काम या सरकारने केले आसून केवळ काँग्रेस पक्षावर टीका करणे आणि जनतेची दिशाभूल करणे हेच काम या देशाचे पंतप्रधान करत आहेत.मणिपूर ला भेट द्यायला वेळ नाही, सर्व सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळ नाही,अच्छे दिनचे स्वप्न आपल्याला दाखविले आणि खिशे मोठ्या उद्योग पतीचे भरले ज्यामुळे आज आपण १० वर्ष यांच्या हातात सत्ता देऊनही जेथे होतो तिथेच अहोत.आणि म्हणून आपले नेते राहुलजी गांधी यांनी आपल्या हातात त्यांच्या स्वाक्षरीने ग्यारंटी कार्ड दिले आहे ज्यामधील ५ न्याय मागण्या इंडिया आघडी सरकार स्थापन होताच पहिल्या कॅबिनेट मध्ये मंजूर केल्या जाणार आहेत यासाठी आपण या लोकसभा निवडणुकीत मतदान करताना देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांचे भविष्य, महिलां भगिनी ची सुरक्षा, आपल्या मुलांना नौकरी, वाढलेली महागाई कमी करायची असेल आणि देशातील कोट्यवधी लोकांचे भविष्य बदलायचे असेल तर ही सुवर्ण संधी असून आपण सर्वांनी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांना निवडून द्यावे असे आवाहन सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर लोकसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.रेणापूर हा काँग्रेस चा बालेकिल्ला असून रेणापूर ने मागितले ते आपल्या पक्षाने आपले आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेब, आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय दिलीपराव देशमुख यांनी रेणापूर वासीयांना दिले आणि आजतागायत आम्ही रेणापूर साठी केलेल्या कामाची पावती म्हणून या निवडणुकीत आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांच्या पाठीशी राहण्याची विनंती करतो आहोत.

रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे काम काँग्रेस पक्षाने आणि आमच्या लोकांनी रेना साखर कारखान्याच्या माध्यमातून केले. आज जिल्हा बँकेकडून शून्य व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला जातो कारण शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतुन बाहेर काढण्याची आमची बांधिलकी असून ती बांधिलकी जपण्याचे काम लातुर जिल्हा बँकेने केले आहे. आज लातुर पेक्षा काकणभर अधिकचा भाव ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रेणापूरच्या शेतकऱ्यांना मिळत आहे. रेणापूर तालुक्यातील रस्त्याचे जाळे अधिक मजबूत कसे होईल,पिण्याचे पाणी,वीज पुरवठा, उद्योग वाढविण्यासाठी आपल्याला काम येणाऱ्या काळात करायचे असून विद्यमान घमेंडी सरकारने पक्ष फोडले, घरे फोडली हे आपण गेल्या कांही दिवसात पाहिले आहे.

यावेळी बोलताना निरीक्षक सर्जे राव मोरे म्हणाले की,लोकसभा निवडणुकीसाठी आपले नेते माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आपल्या सर्वांना हवेहवेसे,उच्च शिक्षित असे डॉ शिवाजी काळगे यांना उमेदवारी दिली असून त्यांना सर्व स्तरातून चांगला पाठिंबा मिळत असून डॉ शिवाजी काळगे यांना निवडून देण्याची आमची सर्वांची जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी आपण सर्वांनी एकदिलाने निभावावी. आजवर काँग्रेस पक्षाने आणि आपल्या सर्व नेत्यांनी कधीच जात पहिली नाही अथवा पक्ष,गट याचा विचार न करता आदर्श राजकिय परंपरा पाळली आहे आणि म्हणूनच आपण सर्वांनी रेणापूर तालुक्यातुन डॉ शिवाजी काळगे याना बहुमताने विजयी करावे अशी विनंती केली. यावेळी बोलताना शिवसेना (उबाठा) गटाचे तालुका अध्यक्ष अनिल फुलारी म्हणाले की, लातुर लोकसभा मतदार संघातील आपले उमेदवार डॉ शिवाजी काळगे हे असून आपल्याला लातुर जिल्ह्याचा विकास आणि हरित क्रांती घडवून आणायची असून विद्यमान सरकारने आम्हला हिंदुत्व शिकवू नये तर विकासावर बोलावे असे म्हणत आपले नेते म्हणजे राम लक्ष्मण अशी जोडी असून त्यांचे हात बळकट करण्यासाठी डॉ शिवाजी काळगे यांना बहुमताने विजयी करावे अशी विनंती केली.दरम्यान या वेळी रेणापूर सह परिसरातील उपस्थित सर्वांनी लातुर लोकसभा मतदार संघातील मविआ चे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना बहुमताने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

या जाहीर प्रचार सभेसाठी माजी आमदार त्र्यंबक भिसे,निरीक्षक सर्जेराव मोरे, यशवंतराव पाटील,मतीनं भाई शेख,आबासाहेब पाटील,ॲड.समद पटेल,रवींद्र काळे,अनिल फुलारी,चंद्रचूड चव्हाण,अनुप शेळके,माजी सरपंच मल्लिकार्जुन हलकुडे, लालासाहेब चव्हाण, सौ. सोमाणी ताई,प्रमोद जाधव, संभाजी सुळ,मकबूल वलांडीकर,चाँदपाषा इनामदार,संभाजी रेड्डी,रामदास पवार,हरिभाऊ गायकवाड,पुजाताई इगे,शशिकांत आकनगिरे,माणिकराव चव्हाण,लक्ष्मणराव मोरे,माणिकराव सोमवंशी, दिलीप पाटील, उमाकांत खलंग्रे,सुपर्ण जगताप,व्यंकटेश पुरी यांच्यासह रेणापूर सह परिसरातील नागरिक, महिला भगिनी,युवक,जेष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भाजपाच्या भूलथापाना बळी पडू नका : वैशालीताई देशमुख

लातूर : प्रतिनिधी- जनसामान्यांशी नाळ तुटलेल्या भाजपाला काहींही करुन फक्त निवडणुक जिंकायची आहे. त्यामुळेच भाजपाचे नेते भूलथापा मारुन मतदान मागत आहेत. कामावर मत मागण्याऐवजी जाती-धर्माचे मुद्दे पुढे करुन सामान्य नागरीक, महिलांची दिशाभूल केली जात आहे. महिला भगिणींनी भाजपाच्या भूलथापांना बळी न पडता काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.

लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील पाखरसांगवी येथील तात्यासाहेब देशमुख यांच्या निवासस्थानी दि. ३० एप्रिल रोजी सकाळी आयोजित महिला मेळाव्यात श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी सुनिता अरळीकर, डॉ. सारीका देशमुख, सीमा क्षीरसागर, दैवशाला राजमाने, तात्यासाहेब देशमुख, अक्षय देशमुख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना वैशालीताई देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी दिवसरात्र कठोर परिश्रम घेतले. देशासाठी काँग्रेस पक्षाने प्राणाची आहुती दिली. सर्व सामान्य माणुस केंद्रबिंदू माणुन काँग्रेस पक्षाने देशाचा विकास केला त्यामुळेच आज आपला देश सुपर पॉवर ठरत आहे. या उलट भाजपाने देशाच्या जडणघडणीत काहींही योगदान दिलेले नाही. त्यांना फक्त सत्ता हवी आहे. लोकशाही मार्गाने सत्तेवर बसून हुकूमशाही पद्धतीने वर्तणुक केली जात आहे. भाजपाला वेळीच धडा शिकविण्याची गरज असून त्यासाठी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवजी काळगे यांचा प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन केले.

या महिला मेळाव्यात सुनीता अरळीकर, दैवशाला राजमाने, राम चामे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन राम चामे यांनी केले. यावेळी राणाबाई सिंगन, विडाबाई सिंगन, अज्ञानबाई देशमुख, मिनाताई सूर्यवंशी, पुष्पा लखादिवे, रंजना सूर्यवंशी, कांताबाई सिंगन, शालूबाई सूर्यवंशी, महानंदा बोयणे, गोजरबाई जाधव, दैवशाला सुनापे, शुभांगी देशमुख, सुनंदा देशमुख, जयमाला देशमुख, रंजना देशमुख, मिना देशमुख, कौसाबाई गुंडेबोयने, सोमाबाई येरंडे, नाना देशमुख, सतीश सिंगन, रामेश्र्वर लखादिवे, लिंगप्पा कापसे, जावेद पठाण, सतीश लखादिवे, वजीर शेख, काकासाहेब देशमुख, राम वाघमारे, काशिनाथ बेलूरकर, सुभाष सिंगन यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रीयकृत बँकेची दुसरी शाखा उघडण्याची मागणी

जळकोट : प्रतिनिधी- शहर व तालुक्यातील बँक ग्राहकांची संख्या लक्षात घेता ती लाखाच्या घरात आहे. आवश्यकतेनुसार बँक शाखा स्थापन करण्याची गरज आहे. भारतीय स्टेट बँकेची तालुकाभरात केवळ जळकोट शहरात एक शाखा आहे. बँकेची शाखा वाढविणे आवश्यक आहे. पण त्याकडे दुर्लक्ष होत असून अजून एका शाखेची मागणी ग्राहकांकडून होत आहे.

जळकोट हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण आहे. येथे तहसील कार्यालय, उपकोषागार कार्यालय, पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, नगर पंचायत, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, महावितरण उपविभागीय कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, सहायक निबंधक सहकारी संस्था, पोलीस ठाणे, दुय्यम निबंधक , ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग अशी विविध शासकीय कार्यालये आहेत. तसेच महाविद्यालये, डी. एड., बी. एड. कॉलेजेस, कृषी विद्यालये, विविध शाळा आहेत. यामुळे बँकेत खाते उघडून आर्थिक व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या ही लाखोंच्या घरात आहे. मात्र जळकोटला एस बी आय बँकेची एकच शाखा आहे. राष्ट्रीयीकृत बँक नवीन शाखा वाढवित नसल्याने ग्राहकांना त्याचा फटका बसत आहे. यामुळे ग्राहकांची होत असलेली गैरसोय, जुनी मागणी व आवश्यकता यांचा विचार करून राष्ट्रीयीकृत बँकेची आणखी एक नवीन शाखा जळकोट येथे मंजूर करावी, अशी मागणी ग्राहक पंचायतीच्या जळकोट तालुका शाखेकडून करण्यात आली आहे. याबाबत तातडीने कारवाई नाही झाल्यास रास्ता रोको आंदोलन करु, असा इशारा ग्राहकांच्या वतीने देण्यात आला आहे.

# शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांवर करडी नजर ठेवण्याचे दिले निर्देश

लातूर, दि. ३०: लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने लातूर शहर विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या स्थिर सर्वेक्षण पथकांची जिल्हा आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सहायक नोडल अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख यांनी अचानक पाहणी करून प्रत्येक वाहनाची तपासणी करण्याचे निर्देश दिले.

लातूर लोकसभा मतदार मतदारसंघात येणाऱ्या सर्व विधानसभा मतदारसंघात स्थिर सर्वेक्षण पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत विविध मार्गावरुन वाहतूक होणाऱ्या वाहनांची तपासणी करून आदर्श आचारसंहितेचा भंग होणारी कोणतीही बाब आढळून आल्यास जप्तीची कारवाई करण्यात येते. त्याचबरोबर आवश्यकता भासल्यास प्रसंगी गुन्हे देखील दाखल केले जातात. लातूर शहर विधानसभा मतदार संघात येणाऱ्या बारा नंबर पाटी, श्याम नगर, बार्शी रोड, हरंगुळ चेकपोस्ट तसेच पेठ येथील स्थिर सर्वेक्षण पथकांची नोडल अधिकारी अनमोल सागर व बाबासाहेब मनोहरे यांनी पाहणी करून आदर्श आचारसंहिता भंग होणार नाह, यादृष्टीने जास्तीत जास्त वाहनांची कसून तपासणी करण्याच्या सूचना दिल्या. या कामात हलगर्जीपणा अथवा कुचराई करणाऱ्या पथकाविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशी सक्त ताकीद दिली. आगामी काळात जिल्हा आचारसंहिता कक्षामार्फत स्थिर सर्वेक्षण पथकांच्या कामकाजाची तपासणी नियमितपणे करण्यात येणार असल्याने स्थिर सर्वेक्षण पथकाने सजग राहून अवैध वाहतूकीवर करडी नजर ठेवून करवाई करण्याचे निर्देश श्री. सागर यांनी यावेळी दिले.

## मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

लातूर, दि. ३० : महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ १ मे २०२४ रोजी सकाळी ८ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. जिल्ह्यातील इतर शासकीय, अर्धशासकीय किंवा एखाद्या कार्यालयास, संस्थेला आपला स्वतः चा ध्वजारोहण समारंभ आयोजित करावयाचा असल्यास त्यांनी तो १ मे रोजी सकाळी ७.१५ च्या पूर्वी किंवा सकाळी ९ च्या नंतर आयोजित करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे अशील नामे श्री नवनाथ गणपती जाधव मु-कुणकी पोस्ट -पाटोदा ता -जळकोट जिल्हा -लातूर यांनी मौजे जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथील दुकान व घर डब्बल मजला ज्याचा जमिन सर्वे नंबर-२२४/१असून जळकोट नगरपरिषद मिळकत क्रमांक १५४०/२ लांबी पूर्व-पश्रि्चम ३०फुट, दक्षिण- उत्तर १५ फुट याची चतुर्सिमा पूर्वेस व दक्षिणेस श्रीकृष्ण भाणूदास कोटलवार यांचे घर, पश्रि्चमेस उदगीर ते जळकोट जाणारा हायवे रोड,उत्तरेस २०फुटाचा रोड त्याचे मुळ मालक श्री दत्तात्रय भाणूदास कोटलवार रा -जळकोट यांच्यापासून कायम विक्री ठराव केलेला असून सदर दुकान व घर डब्बल मजला संदर्भाने इतर कोणासही विक्री, विक्रीचा ठराव,गहाण, बक्षीस,दान किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार केला असेल अथवा सदरील मिळकतीवर कोणाचे अतिक्रमण,वाद विवाद, कोर्ट केसेस तसेच खाजगी किंवा सरकारी कर्ज बोजा असल्यास पंधरा दिवसाच्या आत माझे अशिल यांच्याकडे आपले आक्षेप व हरकती कळवावेत. पंधरा दिवसानंतर आलेले तक्रार आक्षेप स्विकारले जाणार नाही व सदर दुकान व घर डब्बल मजला कायदेशिर हस्तांतर खरेदीखत केले जाईल याची नोंद घ्यावी.

दि. ३०/०४/२०२४

**आपला**

श्री नवनाथ गणपती जाधव रा.कुणकी, पोस्ट पाटोदा ता. जळकोट जि. लातूर मो. ९४२१७१५१७५

## जाहीर प्रगटन

उदगीर तालुका व परिसरातील सर्व जनतेस या जाहीरप्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, माझे अशिल सारिका माधवराव गोंड वय ३२ वर्षे धंदा नौकरी रा. उदगीर ता.उदगीर जि.लातूर येथील असून त्यांनी मौजे लोणी ता.उदगीर जि.लातूर येथील ग्रा.प.हद्दीतील सर्वे नं. २३ मधील प्लॉट नं. ०९ एकुण क्षेत्र ३०५.७५ चौ.मी ज्याची चतु: सिंमाः

पुर्वेस : प्लॉट नं. ८
पश्चिमेस : सर्वे नं. २३ चा भाग
दक्षिणेस : सर्वे नं. २३ चा भाग
उत्तरेस : १२ मीटरचा रस्ता

नमुद चतुःसिंमेतील मिळकतीच्या खरेदीबाबतचा ठराव मिळकतीचे ठरावाआधारे घेतलेले खुरेशी मुनीर बशीर अहेमद व शेख जमील नजीर अहेमद दोघे रा. उदगीर जि.लातूर यांचे सोबत केला असून इसारापोटी माझे अशिलांनी काही रक्कम मिळकतधारकास दिली आहे व ठराव प्रमाणे मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत माझे अशिल त्यांचे हक्कात करून घेणार आहेत.

तरी या प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतास सुचीत केले जाते की, नमुद मिळकतीच्या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणास आ-क्षेप अथवा हरकत असेल अथवा कोणाचे व्यक्तीशः कायदेशिर हक्क, कर्ज बोजा, मृत्यूपत्र, गहाणखत, दानपत्र, भाडेपट्टा, वारसा हक्क, अथवा मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात तसेच इतर शासकीय, महसुल कार्यालयात प्रकरण प्रलंबित असेल तर सदरील प्रगटन प्रसिध्द झाले पासून सात दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर लेखी आक्षेप अथवा हरकती नोंदवावे. मुदतीत कोणाचा आक्षेप / उजर न आल्यास सदरील मिळकत निर्विवाद आहे असे समजून माझे अशिल मिळकतीच्या खरेदीखताबाबतचा पुढील व्यवहार पार पाडतील. मुदतीनंतर जर कोणाचे आक्षेप आल्यास ते माझे अशिलावर व त्याचे कायदेशिर हक्कावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले जाते.

दिनांक २९/०४/२०२४

जाहीर प्रगटन देणार
सारिका माधवराव गोंड
रा. उदगीर ता.उदगीर जि.लातूर

तर्फे
ॲड. सुरेश एम. मुदुडगे
नगरेश्वर मंगल कार्यालय शेजारी
उदगीर ता.उदगीर जि.लातूर
मो. नं. ९४२३३५१६९२





**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोर (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)
डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव





## उदगीर मनोरंजन

70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

